## उपसंचालक, पेंच व्याघ्र प्रकल्प, नागपूर यांचे कार्यालय

दुसरा माळा, नविन प्रशासकिय इमारत (वन भवन), शासकिय मुद्रणालयाजवळ, झिरो माईल, सिव्हील लाईन, नागपूर - ४४० ००१
दुरध्वनी क्र. ०७१२ - २९९७६१२ Email ID: dfowlpench@mahaforest.gov.in Website: - www.penchtigerreserve.maharashtra.gov.in


----------------------------------------

फार्म क्रमांक -
(कार्यालयामार्फत भरणा केले जाणार)

# निसर्गानुभव कार्यक्रमात सहभागी होण्यासाठी करावयाचा अर्जाचा नमुना
# निसर्गानुभव कार्यक्रम दिनांक २३ मे, २०२४

(अर्ज भरण्यापूर्वी मागे दिलेल्या सुचना काळजीपूर्वक वाचाव्यात)

फोटो

१. अर्जदाराचे संपुर्ण नाव-: ----------------------------------------

----------------------------------------

२. अर्जदाराचा पत्र -: ----------------------------------------

व्यवहाराचा संपूर्ण पत्ता-: ----------------------------------------

----------------------------------------

(पत्यासाठी ड्रायव्हींग लायसन्स, मतदान ओळखपत्र, पासपोर्ट, आधार यापैकी एका ओळखपत्राची झेरॉक्स)

३. फोन नंबर ---------------------- मो.क्रमांक ----------------------

४. E-mail ID ----------------------------------------

५. जन्म तारिख ----------------------

६. शिक्षण ---------------------- व्यवसाय/नौकरी ----------------------

७. या अगोदर वन्यप्राणी गणनेत सहभागी झाल्याचा तपशील -: ----------------------

----------------------------------------

८. पर्यावरण संस्थेशी संलग्न असल्यास :-

अ) संस्थेचे नाव व पत्ता - : ----------------------------------------

----------------------------------------

----------------------------------------

ब) केव्हापासुन संलग्न आहात -: ----------------------------------------

क) पर्यावरण संबंधीत केलेल्या -: ----------------------------------------

कामाचा तपशील ----------------------------------------

९. कोणत्या वनपरिक्षेत्रात गणनेसाठी इच्छुक आहात -: १) पवनी (एकसंघ नियंत्रण) ☐

(एका रकान्यामध्ये √ अशी खुण करा) २) नागलवाडी (एकसंघ नियंत्रण) ☐

३) कुही (वन्यजीव) ☐ ४) उमरेड (वन्यजीव) ☐ ५) पवनी (वन्यजीव) UPK ☐

१०. ओळखपत्र क्रमांक (आधार / वाहन परवाना / पासपार्ट इ.) ----------------------

११. प्रिंट / ईलेक्ट्रानिक मिडीयाचे प्रतिनिधी असेल तर त्याचा तपशील :----------------------

दिनांक - अर्जदाराची स्वाक्षरी

# निसर्गानुभव कार्यक्रमात सहभागी होणेसाठी अटी व शर्ती

१. निसर्गानुभव कार्यक्रमाची सुरुवात **दि. २२ मे, २०२४ रोजी दुपारी ०३.०० वाजता सुरु होईल व दुसऱ्या दिवशी दि. २३ मे, २०२४ रोजी सकाळी ०८.०० वाजता** निसर्गानुभव कार्यक्रमाचा समारोप होईल.
२. प्रत्येक व्यक्तीस सहभागी होण्यासाठी स्वतंत्र अर्ज करावा लागेल.
३. अर्जासोबत पासपोर्ट आकाराचे स्वाक्षरी केलेले दोन फोटो जोडावे.
४. अर्जातील सर्व रकाने भरावे. जे रकाने लागु नाहीत, तेथे **लागु नाही** असे लिहावे.
५. निसर्गानुभव कार्यक्रमासाठी मर्यादित जागा उपलब्ध असल्याने सर्व इच्छुक अर्जदारास सहभागी करता येणार नाही. त्याबाबत निर्णय घेण्याचे अधिकार पेंच व्याघ्र प्रकल्पाचे व्यवस्थापनास राहील. याबाबत त्यांनी घेतलेला निर्णय अंतीम राहील.
६. निसर्गानुभव कार्यक्रमासाठी मचाणाचे वाटप उपसंचालक, पेंच व्याघ्र प्रकल्प, नागपूर या कार्यालयामार्फत करण्यात येईल.
७. निसर्गानुभव कार्यक्रमाकरिता **प्रति उमेदवार २००० रुपये शुल्क** आकारले जाईल ज्यामध्ये त्यांना एक टी शर्ट आणि कॅप देखील दिली जाईल. सदर शुल्क हे निवड झालेल्या व्यक्तींना अग्रिम स्वरुपता (Advance) भरणा करणे अनिवार्य राहील, अग्रिम भरणा न केल्यास त्यांची निवड रद्द करण्यात येईल. शुल्क भरणा करणेबाबत आवश्यक माहिती निवड झालेल्या सहभगींना वेगळयाने कळविण्यात येईल, याची नोंद घ्यावी. भरणा केलेले शुल्क कोणत्याही परिस्थितीमध्ये परत करण्यात येणार नाही.
८. निसर्गानुभव कार्यक्रमाकरिता मचाण वर अन्न व पाणी पुरविले जाईल.
९. एका मचानावर फक्त ०१ व्यक्तीला (१ निसर्ग प्रेमी व १ कर्मचारी) व्यक्तीला निसर्गानुभव कार्यक्रमासाठी बसता येईल.
१०. मचानापर्यंत सहभागी होणाऱ्या व्यक्तींना त्याचे वाहन नेता येणार नाही.
११. सहभागी होणाऱ्या व्यक्तींना संरक्षीत क्षेत्राचे सर्व नियम बंधनकारक राहतील.
१२. निसर्गानुभव कार्यक्रमाकरीता सहभागी होणाऱ्या व्यक्तींना आपल्या प्रकृतीबाबत काळजी स्वत: घ्यावी लागेल.
१३. निसर्गानुभव कार्यक्रमाच्या काळात कोणत्याही प्रकारची दुर्घटना झाल्यास सर्वस्वी जबाबदारी ही सहभागी होणाऱ्या व्यक्तींची राहील.
१४. सहभागी होणाऱ्या व्यक्तींचे कपडे निसर्गाशी समरस असावे.
१५. सदर निसर्गानुभव कार्यक्रमाचे अर्ज भरुन **penchnisarganubhav@gmail.com** या Email वर **दिनांक ०१ मे, २०२४ रोजी सकाळी १०.०० वा. पासुन ते ०३ मे, २०२४ दुपारी ०२.०० वाजेपर्यंत** पाठवावे. दिलेल्या मुदती पुर्वी किंवा नंतर येणाऱ्या अर्जाचा विचार केला जाणार नाही. प्रथम येणाऱ्या अर्जाचा प्रथम प्राधान्याने विचार करण्यात येईल.
१६. निवड झालेल्या व्यक्तीना उपसंचालक, पेंच व्याघ्र प्रकल्प, नागपूर या कार्यालयाकडुन दुरध्वनी / ई - मेल द्वारे कळविण्यात येईल. तसेच ज्या व्यक्तींची निवड निसर्गानुभव कार्यक्रमाकरिता होईल त्यांनी त्यांचा मुळ अर्ज, ०१ पासपोर्ट आकारचे फोटो व आवश्यक दस्ताऐवज आपणास आवंटीत करण्यात आलेल्या वनपरिक्षेत्रातील संबंधीत नियंत्रण अधिकाऱ्यांकडे दि. २२ मे, २०२४ रोजी निसर्गानुभव कार्यक्रम, २०२४ सुरु होण्यापुर्वी जमा करणे अनिवार्य राहील.
१७. कोणतेही कारण न देता मचान संख्या कमी करणे, कार्यक्रमाच्या वेळेमध्ये बदल करणे तसेच संपुर्ण निसर्गानुभव कार्यक्रम, २०२४ रद्द करण्याचा अधिकार उपसंचालक, पेंच व्याघ्र प्रकल्प, नागपूर यांनी राखुन ठेवला आहे व त्यांचा निर्णय सर्व सहभागी होणाऱ्या व्यक्तींसाठी अंतिम व बंधनकारक राहील.

## निसर्गानुभव कार्यक्रमाच्या दरम्यान पाळावयाचे नियम

१. सद्यस्थितीत उन्हाळयाचे तापमान लक्षात घेता अनेक वन्यप्राणी हे दिवसातुन अनेकदा पाणी पिण्यासाठी पानवठयावर येतात. ही बाब लक्षात घेऊन सहभागी व्यक्तींनी काळजीपुर्वक नोंदी घ्याव्यात. एकाच प्राण्याची दोनदा नोंदी होणार नाही याची दक्षता घ्यावी.
२. निसर्गानुभव कार्यक्रमात मचानावर बसलेले असतांना जोरात बोलण्यास, मोबाईल फोन, फ्लॅश कॅमेरा, संगीत वाद्य, सर्च लाईट किंवा विजेरीचा वापर करण्यास व इत्यादी वस्तु ठेवण्यास सक्त मनाई आहे.
३. उग्रवास असलेले सुगंधीत द्रव्य कपड्यांवर लावु नये.
४. मचानावर जातांना सोबत मासाहारी भोजन, सिगारेट, बीडी, मद्य, तंबाखु जन्य पदार्थ व इतर आक्षेपार्ह वस्तु घेवुन जाण्यास पूर्णपणे बंदी आहे. मचानावर असतांना भडक रंगाचे किंवा पांढरे शुभ्र कापड वापरु नये व निसर्गाशी एकरुप अशा रंगाचेच कपडे परिधान करावे.
५. मचानीवरील सहभागींनी परवानगी शिवाय खाली उतरु नये व पॉलीथीन बॅग व तत्सम साहित्य सोबत बाळगु नये.
६. सहभागी होणाऱ्या व्यक्तीस मचान निवडता येणार नाही व मचानात बदल करण्यात येणार नाही. त्याप्रमाणे एकदा मचानवर बसल्यावर निसर्गानुभव कार्यक्रम संपेपर्यंत परत येता येणार नाही. त्यांना दिलेला फार्म निसर्गानुभव कार्यक्रम पूर्ण होताच स्वाक्षरीसह परत करावा.
७. ठरवुन दिलेल्या मार्गाने / वाहनाने व ठरवुन दिलेल्या वेळीच आपल्याला निसर्गानुभव कार्यक्रमा स्थळी उपस्थित राहणे अनिवार्य आहे.
८. मचानावर बसल्यावर एकमेकांसोबत जोराने बोलु नये.
९. सोबत बसलेल्या वनविभागाच्या कर्मचाऱ्यांनी दिलेल्या निर्देशानुसार व वन्यजीव (संरक्षण) अधिनियम १९७२ नुसार सर्व नियम बंधनकारक राहतील.
१०. प्रवेश घेण्यापूर्वी सर्व सहभागी व्यक्तींची तपासणी कर्मचाऱ्यामार्फत केली जाईल. तपासणीमध्ये काहीही आक्षेपार्ह वस्तु आढळल्यास संबंधीताची नोंदणी रद्द होईल.
११. वरील नियमांचा भंग केल्यास संबंधीत सहभागी व्यक्तींवर वन्यजीव (संरक्षण) अधिनियम १९७२ अन्वये कार्यवाही करण्यात येईल, याची दखल घ्यावी.

**(डॉ. प्रभु नाथ शुक्ल)**
उपसंचालक,
पेंच व्याघ्र प्रकल्प, नागपुर